# प्रकरण ४

(अ) आस्थापना विषयक -

जेव्हा एखादे पद रिक्त असेल किंवा रिक्त होणार असेल त्यावेळी प्रमुख वैद्यकिय अधिक्षक (उपनगरीय रुग्णालये) यांच्या मार्फत कामगार अधिकारी/ अधिक्षीका सेवानिसुश्रुषा/ अतिरिक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी (मुख्यालय) यांना सदर रिक्त पद भ्रण्यासाठी विज्ञापना सादर केली जाते. जर एखादे नविन पद निर्माणकरावयाचे असेल तर प्रमुख वैद्यकिय अधिक्षक (उपनगरीय रुग्णालये) यांच्याकडे तद्संबंधी प्रस्ताव सादर केला जातो. संबंधीत अधिका-यांच्या संमतीनंतर सदर नविन पद हे रिक्त पद भरण्याच्या पध्दती प्रमाणे भरले जाते.

(ब) खरेदी दुरुस्ती -

प्रमुख वैद्यकिय अधिक्षक (उपनगरीय रुगणालये) यांना वैद्यकिय ऋणकणिय उपकरणे दुरुस्ती व यांत्रिक खाते यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला जाते. प्रमुख वैद्यकिय अधिक्षक/ सह आयुक्त वै. शि. आरोग्य / महापालिका आयुक्त / स्थायी समिती यांच्या मंजुरी नंतर खरेदीच्या मुल्यानुसार सार्वजनिक जाहिराती व्दारे निविदा मागविण्यात येतात. सदर निविदा नंतर लेखापाल विभागाने पुर्ण तपासणी केल्यानंतर तव्दिषयक मागणी केली जाते.